# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०– २५६२११५६
२५६२११५७
२५६२११६१
२५६२११६३

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे–४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
वेबसाइट : www.unipune.ac.in
ईमेल : approval@unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीसीओ/८६

दिनांक : २१/०१/२०२१

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक

सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

संदर्भ : १) विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना दि. १८ जुलै, २०१८
२) शासन निर्णय क्र. Misc-2018/C.R.56/2018 UNI-I, दिनांक ०८ मार्च, २०१९
३) शासन शुद्धीपत्रक क्र. Misc-2018/C.R.56/2018 UNI-I,, दिनांक १० मे, २०१९
४) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. युएनआय/(०२/२१)/विशि–१/४१०, दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजीचे पत्र

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय शासन निर्णयास अनुसरुन व प्राप्त आदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. १८ जुलै, २०१८ च्या मार्गदर्शक सूचना शासनाने दि. ०८ मार्च, २०१९ रोजी निर्गमित केलेल्या आहेत. तसेच दि. १० मे, २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये त्यामध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे – १ यांच्या दि. १३ जानेवारी, २०२१ रोजीच्या निर्देशानुसार यापुढे अर्हताधारक व पात्रता पूर्ण केलेल्या अध्यापकांसाठी सेवाअंतर्गत प्रगती योजनेअंतर्गत (C.A.S.) निवड समितीची बैठक संबंधित महाविद्यालयाने त्यांच्या स्तरावर त्वरित आयोजित करणे आवश्यक आहे.

शासन परिपत्रक दिनांक ०८ जुलै, २०१९ मधील कॅस अंतर्गत पदोन्नतीच्या तरतूदी विचारात घेता, अध्यापकांची कॅस प्रकरणे ही अर्हता व पात्रता धारण केल्यानंतर विनाविलंब निकाली काढण्यात यावी. तसेच अध्यापकांच्या पदोन्नतीस विलंब होऊन अध्यापकांचे नुकसान होऊ नये ही बाब विचारात घेऊन कॅस बाबत वेळापत्रक निश्चित करावे किंवा दर महिन्याला ठराविक दिवशी अथवा शेवटच्या आठवडयात कॅससाठी बैठक आयोजित करावी.

कळावे,

आपला,

उपकुलसचिव